The South Asian Academic Research Chronicle
ISSN 2454 - 1109
A Peer Reviewed Refereed and Indexed International Inter-disciplinary Open Access Monthly e-Journal

# संत जनाबाई साहित्य आणि जीवन कार्य

**प्रा.डॉ.मारोती बालासाहेब भोसले**
मराठी विभागप्रमुख,
स्वा. सै. सूर्यभानजी पवार महाविद्याल, पूर्णा (जं.)
जि. परभणी-431401 (महाराष्ट्र).

## • प्रस्तावनाः-

संताची भूमी म्हणून ओळखल्या जाणा-या महाराष्ट्रामध्ये तत्वज्ञान संस्कृत भाषेमध्ये बंदिस्त करुन ठेवले होते. ते संस्कृत भाषा अवगत नसणारांसाठी काहीच उपयोगाचे नव्हते. तेव्हा सर्वसामान्य जनतेच्या अडीअडचणीकडे फारसे गांभीर्याने कोणाचे लक्ष नव्हते. अशा अंधारलेल्यावेळी संत नामदेवांनी पुढाकार घेऊन अठरापगड जातीधर्माच्या वारकरी संप्रदायाच्या सर्व अनुयायांना एकत्र आणून 'संतमेळा' स्थापन केला आणि वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे कार्य जोमाने सुरू केले.

संत नामदेव यांचे समाकालीन संत ज्ञानेश्वर यांनी भगवत गीतेतील संस्कृत तत्वज्ञानावार महाभाष्य करणारा 'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ तत्कालीन लोकभाषा अर्थात प्राकृतमध्ये लिहून संस्कृत भाषेतील तत्वज्ञान मराठी भाषेत आणण्याचे ऐतिहासिक कार्य केले. संत नामदेवांनी स्थापन केलेल्या संत मेळयात संत ज्ञानेश्वर, संत जनाबाई, संत चोखामेळा, संत गोराकुंभार, संत सावता माळी, संत नरहरी सोनार, संत सेना न्हावी असे अनेक संत जोडल्या गेले. त्याप्रत्येक संताने आपापल्या परीने खूप योगदानही दिले. त्याचा महाराष्ट्राच्या सामाजिकतेत अमुलाग्र बदल झाला. त्यामध्ये विशेष योगदान ठरले ते संत जनाबाईचे. परंतु त्यांच्या साहित्य आणि चरित्राचा व्हावा तसा अभ्यास झालेला दिसत नाही. म्हणून प्रस्तुत विषयावर मंथन व्हावे यासाठी अभ्यासाठी हा विषय निवडला आहे.

## • संत जनाबाईंचा अल्पपरिचयः-

मराठवाडयातील परभणी जिल्हयात गोदावरी नदीच्या काठावर असणा-या 'गंगाखेड' या गावी संत जनाबाई यांचा जन्म झाला. त्यांची आई करुंड व वडील दमा हे दाम्यत्य विठ्ठल भक्त होते. तत्कालिन शूद्र समजल्या जाण-या जातीत जन्मलेली जनाबाई पाच-सहा वर्षाची असताना नियतीने फार मोठा आधात केला. बालवयात तिचे आईचे छत्र हरवले. निरागस वयात आईविना पोरकी झालेली पोर वडीलांनी औंढा तालुक्यातील नरसी बामणीचे मुळचे राहणारे विठ्ठल भक्त दामाशेट्टी हे पंढरपूरला राहात होते, त्यांच्याकडे आणून सोडली. त्यानंतर संसाराचा त्याग करुन दमा विठ्ठलभक्तीत रममान झाले काही वर्षानंतर तेही निवर्तले.

अनाथ जनाबाईला दामाशेट्टीनी पोटच्या पोरीसारखे सांभाळले. जनाबाई दामाशेटटींच्या घरातील पंधरावी सदस्य होती.

'नामदेवाचे घरी । चौदा जणे स्मरती हरि ।।
चौघे पुत्र चौघी सुना । नित्य स्मरती नारायणा ।।
आणिक मायबाप पाटी । नामदेव रानाबाई ।।
आऊलेकी लिंबाबाई बहिणी । पंधरावी ती दासीजनी ।।'

जनाबाई नामदेवांच्या घरी दासी म्हणून राहिली. तिने सडा, सारवण, दळण, कांडण, धुणी, भांडी, पाणी भरणे, सरपण, गोव-या वेचणे, इत्यादी प्रकारची सर्व कामे केली. संत नामदेवांना अंगाखांद्यावर खेळविणारी जनाबाई नामदेवांच्या सहवासात विठ्ठल भक्तीत रममान झाली. तिला विठ्ठल भक्तीची गोडी लागली. ती विठ्ठलमय बनली. पुढे अभंग रचना करू लागली. जनाबाईच्या नावावर जवळपास 350 अभंग उपलब्ध आहेत. जनाबाईच्या सविस्तर चरित्राचा अनेक अभ्यासकांनी शोध घेण्याचा प्रयत्न केला. परंतु ते उपलब्ध होत नाही. अशी खंत त्यांनी व्यक्त केली आहे. जनाबाईंच्या जन्माविषयीची नोंद उपलब्ध नाही. परंतु त्या पंढरपूर येथे इ.स. 1350 ला समाधिस्त झाल्याची नोंद आहे.

## • संत जनाबाईंचे साहीत्य लेखनः-

संत जनाबाईंचा जन्म ज्या कुटुंबामध्ये झाला, ते वारकरी होते. ज्या कुटुंबात त्यांचे बालपण गेले आणि त्या लहानाच्या मोठ्या झाल्या, तेही विठ्ठल भक्त होते. ज्या संत नामदेवांच्या सहवासात जनाबाई राहात होत्या त्यांनी प्रतिज्ञा केली होती 'ज्ञानदिप लावू जगी' त्यात जनाबाईंचा खारीचा वाटा आहे. नामदेवांनी शतकोटी अभंग रचले. जनाबाईंनीही आपले जीवनानुभव शब्दबध्द केले आहेत. उपजत अंगी असणारी प्रतिभा नामदेवांच्या सहवासात बहरली. त्यांनी 'कृष्णजन्म', 'प्रल्हादचरित्र', 'हरिश्चंद्राख्यान', 'दशावतार', 'बालक्रीडा' या बरोबरच अभंग, पाळाणा, पदे, आरती, स्फूट रचना असे एकूण 350 अभंग रचले.

संत जनाबाईच्या अभंगामध्ये काही स्वतंत्र प्रनिभेच्या आख्यानकविता देखील आहेत. त्यात भक्ती, नाम महिमा, संत महिमा, आत्मरुपदर्शन हे गुणविशेष आढळतात. त्याच बरोबर परमेश्वर प्राप्तीची तळमळ आणि आर्तता प्रकट झालेली आहे. त्यात स्त्रीमनाचा हळुवारपणा व भक्तीची उत्कटता जाणवते.

संत जनाबाईना आयुष्यात अनेक ब-यावाईट प्रसंगांना तोंड द्यावे लागले. मानहानी, मनःस्ताप सहन करावा लागला. त्यांची विठ्ठलावर निःसीम भक्ती होती. त्यामुळे त्यांना विठ्ठल प्राप्ती झाली. म्हणून त्यांना माता-पित्याच्या जाण्यानेही निराधार वाटले नाही. ती उणीव विठ्ठलाने भरुन काढली. त्यांचा विठ्ठलावर प्रचंड विश्वास आणि श्रध्दा होती. एकवेळ बडव्यानी

जनाबाईंवर विठ्ठलाचे पदक चोरीचा आळ घालून मारहाण केली आणि लोहसुळावर फाशी देण्याची शिक्षा सुनावली. परंतु पांडुरंगाच्या कृपेमुळे त्या लोहसुळाचे पाणी झाल्याचा उल्लेख त्यांचा अभंगातून आला आहे.

'मी परदेशी अनाथ दोन । कोण करील माझे धारण ।।
एकोनि जनीचे करुणवचन । जगजिवन पावले ।।
लोहसुळ रोवला होता धरणी । त्याचे लक्षणी झाले पाणी ।।
ऐसे कौतुक देखता जनी । आश्चर्य झाले सकलांसी ।।'

जनाबाईंची अभंगवाणी विठ्ठलाच्या भक्ती रसात न्हाऊन निघाली आहे.

## • संत जनाबाईंचा भक्तीः-

सर्व सामान्य माणूस जेव्हा अडचणीत, संकटात सापडतो. आपल्यावर ओढवलेल्या प्रसंगामुळे पुढे काहीच मार्ग दिसत नाही. त्यावेळी माणसाला त्यातून बाहेर पडण्यासाठी कुणाचा तरी आधार हवा असतो. तेव्हा तो मदतीसाठी ईश्वराचा धावा करीत असतो. किंवा आपल्याला ईश्वराकडे काही मागायचे असते. तेव्हा आपण ईश्वराची भक्ती करीत असतो. परंतु निर्हेतुकपणे ईश्वरभक्ती करणारांचे प्रमाण अत्याल्प म्हणजे बोटावर मोजण्याऐवढे कमी असते. त्या पैकी एक होत्या संत जनाबाई.

भक्तश्रेष्ठ संत नामदेवांच्या सहवासात संत जनाबाई विठ्ठल भक्तीकडे अलगतपणे ओढल्या गेल्या आणि पांडुरंगाच्या भक्तीत आकंठ बुडाल्या. त्यांचे संपूर्ण विश्व पंढरीरायाने व्यापून टाकले. पांडुरंगालासखा सोबती मानत.

'देव येथे देव तेथे । देवाविण नाही रिते ।।
जनी म्हणे विठाबाई । भरुनी उरले अंतरबाही ।।'

संत जनाबाईचे विश्व अंतरबाहयारुपाने विठ्ठलाने व्यापून टाकले होते. त्यामुळे विठ्ठल देखील जनाबाईंच्या भक्तीमुळे प्रसन्न होऊन संत जनाबाईला प्रत्यक्ष काम करू लागतो.

'साळी कांडायास काढी । चक्रपाणी उखळ झाडी ।
धुणे घेऊनी काखेसी । जनी गेली उपवासी ।
मागे विठ्ठल धाविला । म्हणे का टाकीले मला ।
जनी बैसली न्हायला । पाणी नाही विसाणाला ।
घागर घेऊन हातात । पाणी आणि दिनानाथ ।'

वरील अभंगावरुन विठ्ठल आणि संत जनाबाई यांचे नाते अव्दैतांचे आहे हे दिसून येते.

## • संत नामदेवांविषयी कृतज्ञताः-

संत जनाबाईंचा जन्म तत्कालिन शूद्र समजल्या जाणा-या जातीत झाला. जन्माने मिळालेले स्त्रीत्व, त्यातच बालवयात आई-वडील वारल्यामुळे वाटयाला आलेले पोरकेपण. दामाशेट्टींच्या घरी धुणी-भांडी करुन काढलेले दिवस. शिक्षणाची नाकारलेली संधी, या सर्व पार्श्वभूमीमुळे जनाबाई स्वतःला अभागी समजत होत्या. परंतु संत नामदेवांच्या सहवासामध्ये राहील्यामुळे त्यांचा दृष्टिकोन सकारात्मक बनला.

'स्त्री जन्म म्हणवुनी न व्हावे उदास । साधुसंता ऐसे केले मना ।।
संतांच्या घरची दासी मी अंकिली । विठोबाने दिली प्रेमकळा विदुर सात्त्विक।'

संत नामदेवांच्या सहवासात मला विठ्ठलभक्तीचा मार्ग सापडला अशी जनाबाईंची भावना आहे.

संत नामदेवांनी संतमेळा जमवून भक्तीचा मार्ग सुरू केला होता. संतमेळयात वडीलधारे गोरा कुंभार मडके बनविण्याचा व्यवसाय करणारे असल्याने संत नामदेवांच्या भक्तीतील उणिवा हेरल्या आणि औंढा नागनाथ येथे जाऊन विसोबा खेचर यांच्याकडून गुरुउपदेश घेण्याचा सल्ला दिला. नामंदेवांनी विसोबांना गुरू मानून त्याच्याकडून दिक्षा घेतली. नंतर नामदेवांच्या भक्तीला डोळसपण प्राप्त झाले. पुढे नामदेव भक्तश्रेष्ठ ठरले. अशा भक्तश्रेष्ठ नामदेवांच्या सहवासात संत जनाबाईंना देखील भक्तीचे धडे मिळाले.

संत जनाबाईं मुळातच संवेदनशील मनाच्या होत्या. नामदेवांच्या सानिध्यात त्यांच्या मनाला प्रेरणा मिळाली. परिणामी जनाबाईंचे कवित्त्व बहरले. आपल्या सारख्या निरक्षर, अज्ञानी, स्त्रीला विठ्ठलाचे दर्शन झाले भक्ती करण्याचा मार्ग सापडला आपले जीवन सार्थकी लागले. हे सर्व केवळ संत नामदेवांमुळे शक्य झाले आहे. त्यामुळे जनाबाई संत नामदेवांना गुरू मानुन स्वतःला 'नामयाची दासी' म्हणून घेतात तर संत नामदेव देखील जनाबाईंचा उल्लेख 'संतवाटीकेतील जाईची वेल' असा करतात. ज्याप्रमाणे संत जनाबाईंच्या मनामध्ये विठ्ठलाविषयी आदर आहे. त्याच प्रमाणे आपले गुरू भक्तश्रेष्ठ संत नामदेवांविषयी देखील तेवढाच आदर आणि कृतज्ञतेची भावना आहे.

## • स्त्री स्वांत्र्याचे पहिले पाऊलः-

संत जाबाईंच्या काळाचा विचार केला तर तत्कालिन समाजाचे स्त्रियांवर मोठ्या प्रमाणावर बंधने लादली होती. स्त्रीने केवळ चुल आणि मुल सांभाळावे. तिने घराबाहेर पडू नये. घराबाहेर पडलेच तर डोक्यावर पदर घेऊन खाली मान घालून नाकाच्या समोर निट चालावे. बाजारात जाऊ नये. शिक्षण घेऊ नये. एकंदरीत विचार केला तर स्त्रियांना दुय्यम स्थान दिले होते. अशावेळी तात्कालिन शूद्र समजल्या जाणा-या जातीमध्ये संत जनाबाईंचा जन्म झाला. बालपणी पोरकेपण वाट्यला आले. दुस-याच्या घरी दासी म्हणून रहावे लागले.

जनाबाई संत नामदेवाच्या सहवासामध्ये राहून त्यांच्या बरोबरीने विठ्ठल भक्ती करू लागली. अभंगरचना करू लागली. जनाबाई सारखा शूद्र जातीतील स्त्रीने हे करणे त्याकाळी कर्मठ समाजकंटकांना पटण्यासारखे किंवा पचण्यासारखे नव्हते. त्यामुळे जनाबाईंना रोखण्याचे अनेक प्रकारे प्रयत्न केले परंतु जनाबाईंनी त्यांना भिक घातली नाही. म्हणून जनाबाईंवर देवाचे पदक चोरी केल्याचा आरोप करुन सुळावर चढवण्याचा प्रयत्न केला. तरीही त्यांची विठ्ठल भक्ती थांबली नाही हे पाहून त्यांच्या व्यक्तीमत्वावर अनैतिकतकचे, गैरवर्तनाचे आरोप करण्यात आले. त्यावर जनाबाईंनी निर्भीडपणे अतिषय परखडपणे आपले मत मांडले आहे.

‘डोईचा पदर आला खांद्यावरी । भरल्या बाजारी जाईल मी ।।1।।
हाती घेईन टाळ खांद्यावरी वीणा । आता मज मना कोण करी ।।2।।
पंढरीच्या वेठे मांडियले पाल । मनगटावर तेल घाला तुम्ही ।।3।।
जनी म्हणे देवा झाले येसवा । निघाले केशवा घर तुझे ।।4।।’

संत जनाबाईंनी वरील अभंगामधून तत्कालिन समाजाचे सर्व बंधनं झुगारुन विठ्ठल भक्ती सुरू ठेवली. हातात टाळ आणि खांद्यावर वीणा घेऊन घराबाहेर पडणारी जनाबाई खांद्यावर पदर आला तरी त्याची पर्वा करत नाही. निंदकांना मनगटावर तेल घालून बोंब मारा, तरी पण मी विठ्ठल भक्ती सोडणार नाही. मला काय नाव ठेवायची ते ठेवा मी देखील पुरुषाप्रमाणे भक्ती करणार आहे. संत जनाबाईचे हे पुरुषांच्या बरोबरीने विठ्ठल भक्ती करणे, समाजाचे बंधन झुगारुन देणे. हे कार्य स्त्री स्वातंत्र्याचे पहिले पाऊल आहे. ते ऐतिहासिक कार्य आहे.

## • संत जनाबाईंचे तत्वज्ञानः-

संत जनाबाईंचे जीवनचरीत्र आणि तत्वज्ञान एक स्त्री संत म्हणून संत मेळयात तसेच संत साहित्यात देखील महत्वाचे आहे. संत जनाबाईंना बालपणापासूनच अतिशय खडतर जीवन जगावे लागले. त्यांनी जगलेले भागलेले अनुभव शब्दबध्द केले. त्यांनी आपल्या दैनंदिन कार्यालाच भक्तीमार्ग बनविले. आपला कामधंदा सोडून ईश्वरभक्ती करणाची गरज नाही.

‘दळितां कांडितां । तुज गाईन अनंता ।।1।।
न विसंबे क्षणभरी । तुझे नाम गा मुरारी ।।2।।
नित्य हाचि कारभार । मुखी हरि निरंतर ।।3।।
माय बाप बंधुबहिणी । तुं बा सखा चक्रपाणी ।।4।।
लक्ष लागले चरणासी । म्हणे नामयाची दासी ।।5।।’

ईश्वरभक्ती करण्यासाठी कर्मकांड करीत बसण्याची आवश्यकता नाही. हे साधे सोपे तत्वज्ञान जनाबाईंनी वरील अभंगामधून सांगितले आहे.

संत जनाबाईंनी आत्मस्थितिपर अभंग लिहिले आहेत. जनाबाईंच्या मनातील संसाराविषयीची भ्रांती नष्ट झालेली होती. त्यामुळे त्यांना ब्रम्हरुप झाल्याचा अनुभव आला. संसार ईश्वररुप वाटला. सर्वत्र विठ्ठल भरून राहिला. जनाबाई सर्व लाभांचे श्रेय सद्गुरुला देऊन टाकतात. त्यांना अव्दैताचा अनुभव आला नसता तर विठ्ठलाच्या चरणाशी एकरुप होता आले नसते. म्हणून प्रपंच आणि परमार्थात सद्गुरू कृपेला अनन्य साधारण महत्व आहे.

'जोड झाली रे शिवासी । भ्रांत फिटली जिवाची ।।1।।
आनंदची आनंदला । आनंद बोधचि बोधला ।।2।।'

संत जनाबाईंच्या अभंगातून अव्दैताचे दर्शन घडते. त्यांच्या अभंगावर संत नामदेव, संत ज्ञानेश्वर यांच्या विचारांचा प्रभाव जाणवतो. त्यांची अभंगवाणी पांडुरंगाच्या भक्तीरसाने ओथंबलेली दिसून येते. त्यांच्या साहित्यातून जीवन विषयक तत्वज्ञान ओसंडून वाहताना दिसते. त्यांच्या साहित्यातून आविष्कृत होणारी संत जनाबाईंची व्यक्तीरेखा सुजान, सुसंस्कृत अशा विदुषीची आहे असे जाणवते तयांच्या साहितयातून अभिव्यक्त होणारे व्यक्तिमनाचे विविध पैलू म्हणजे संत जनाबाई ह्या तत्कालिन समाजव्यवस्थेतील एक महान तत्वज्ञानी होत्या. आज एकविसाव्या शतकातील विज्ञानयुगात देखील संत जनाबाईंचे चरित्र आणि तत्वज्ञान आधुनिक स्त्रियांना आदर्श ठरावे असेच आहे.

## निष्कर्षः-

संतांची भूमी म्हणून ओळखल्या जाणा-या महाराष्ट्रात तेराव्या शतकात संत नामदेवांनी 'संतमेळा' स्थापन करुन समाजप्रबोधन सुरू केले. संत ज्ञानेश्वरांनी संस्कृत भाषेत बंदीस्त करुन ठेवलेले तत्वज्ञान ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून प्राकृत भाषेत आणले संत मेळयातील महत्वाची संत जनाबाई संत नामदेवांच्या सहवासात विठ्ठल भक्ती करू लागली. एका स्त्रीला विठ्ठलभक्ती करणे तत्कालीन समाज कंटकांना रुचले नाही. त्यांनी संत जनाबाईंवर विठ्ठलाचे पदक चोरल्याचा आळ घातला, मारहान केली, लोहसुळावर फाशी देण्याची शिक्षा सुनावली.

संत जनाबाईंनी तत्कालीन समाजाने स्त्रियावर लादलेली सर्व बंधने झुगारुन दिली. त्यामुळे जानाबाईंवर गैरवर्तनाचे, अनैतिकतेचे आरोप करण्यात आले. त्या आरोपांना न जुमानता हातात टाळ व खांद्यावर वीणा घेऊन भरल्या बाजारी मी जाणार म्हणून ठणकावून सांगितले. जनाबाईंचे त्यावेळी असे धाडसी कार्य म्हणजे स्त्री स्वातंत्र्याचे पहिले पाऊल मानायला हरकत नाही.

संत जनाबाई मुळातच संवेदनशील मनाच्या होत्या. संत नामदेवांकडून त्यांना अभंग लेखनाची प्रेरणा मिळाली नामदेवांच्या संगतीत त्यांची प्रतिभा बहरली. त्यांनी जगलेले भोगलेले जीवनानुभव शब्दबध्द केले. संत नामदेवांमुळे भक्तीमार्ग सापडला म्हणून

नामदेवांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी 'दासी नामयाची' असा स्वतःचा उल्लेख करतात. त्यांच्या साहित्यावर संत ज्ञानदेव, संत नामदेवांचा प्रभाव जाणवतो. कामधंदा सोडून ईश्वरभक्ती करण्याची गरज नाही हे साधे, सोपे तत्वज्ञान जनाबाईंनी सांगितले. ते आजच्या स्त्रियांना प्रेरणादायी ठरणारे आहे.

## संदर्भग्रंथः-

1. इर्लेकर सुवासिनी – संत जनाबाई – मॅजेस्टिक पेकाशन, मुंबई.
2. शेवडे इंदुमती – संतकवयित्री – पॉपुलर प्रकाशन, मुंबई.
3. गोसावी रा.गो. – श्री सकलसंतगाथा – सारथी प्रकाशन, पुणे.
4. मोहिते शिवाजीनाव (संपादक) संत जनाबाईंचे निवडक अभंग – कर्मवीर प्रकाशन, पुणे.
5. चिटणीस (संपादक) – संत जनाबाई चरित्र व काव्य – अनमोल प्रकाशन पुणे.